मफुकृवि ई वार्ता
जानेवारी २०२१



## महात्मा फुले कृषि विद्यापीठात ७२ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा







**दि. २६ जानेवारी, २०२१.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे ७२ वा भारतीय प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा झाला. याप्रसंगी कुलगुरू डॉ. अशोक ढवण यांचे हस्ते ध्वजारोहन करण्यात आले. या कार्यक्रमास अधिष्ठाता (कृषि) डॉ. अशोक फरांदे, संशोधन तथा विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख, कुलसचिव श्री. मोहन वाघ, पदव्युत्तर महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ, अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार, सहयोगी अधिष्ठाता (निकृशि) डॉ. श्रीमंत रणपिसे, हळगाव कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. मिलिंद अहिरे, नियंत्रक श्री. विजय कोते, विद्यापीठ अभियंता श्री. मिलिंद ढोके, प्रमुख शास्त्रज्ञ (बियाणे) डॉ. आनंद सोळंके, सुरक्षा अधिकारी डॉ. सुनिल फुलसावंगे, विविध विभागांचे विभाग प्रमुख, शास्त्रज्ञ, प्राध्यापक, कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी कुलगुरु डॉ. अशोक ढवण मार्गदर्शन करतांना म्हणाले की आज आपण ७२ वा प्रजासत्ताक दिन साजरा करत आहोत. गेल्या ५० वर्षात महात्मा फुले कृषि विद्यापीठाने अन्न सुरक्षेतेत महत्वाचे योगदान दिले आहे. संशोधनात विद्यापीठाने आत्तापर्यंत विविध पिकांचे २५५ पेक्षा अधिक वाण, ३६ अवजारे आणि १५०० पेक्षा जास्त शिफारशी शेतकऱ्यांसाठी प्रसारीत केल्या आहेत. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील वेगवेगळ्या संशोधन केंद्रांवर आत्तापर्यंत झालेल्या व होत असलेले संशोधन हे आपल्या शेतकरी बाधवांसाठी खुप मोलाचे आहे. विद्यापीठाच्या अर्थशास्त्रज्ञांनी तयार केलेल्या अहवालानुसार देशाच्या अर्थव्यवस्थेत ९० हजार कोटींची भर या विद्यापीठाने संशोधीत केलेल्या प्रमुख पिकांमुळे झालेली आहे.

मफुकृवि ई वार्ता
जानेवारी २०२१








कमी मनुष्यबळामध्ये एवढे मोठे संशोधन करत असतांना आपणास आता कृषि पदवीधरांमध्ये उद्योजकाचे बीज रुजवण्याचे महत्वाचे काम करावे लागणार आहे. याकरीता इनक्युबेशन सेंटर्स तयार करावे लागतील जेणेकरुन कृषि पदवीधर वेगवेगळ्या उद्योगांशी जोडले जातील.

यावेळी ध्वजारोहन प्रसंगी कुलसचिव श्री. मोहन वाघ यांनी संविधानाच्या उद्दिष्ठांची शपथ उपस्थितांना दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सुरक्षा अधिकारी डॉ. सुनिल फुलसावंगे यांनी केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठाच्या सुरक्षारक्षकांनी संचलन करुन मानवंदना दिली. या समारंभानंतर पदव्युत्तर महाविद्यालयाच्या स्मार्ट डिजीटल क्लासरुमचे उद्‌घाटन कुलगुरुंच्या हस्ते करण्यात आले. यावेळी स्वच्छ परिसर, सुंदर परिसर, सुरक्षीत परिसर या संकल्पनेनुसार २६ जानेवारी निमित्त विद्यापीठातील कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानामध्ये स्वच्छता अभियान राबविण्यात आले. यामध्ये विद्यापीठाचे कुलगुरु, कुलसचिव, अधिकारी व निवासस्थानामध्ये राहणारे अधिकारी, कर्मचारी कुटुंबासह सहभागी झाले होते.

## गणेशखिंड बॉटनीकल गार्डन जागतिक वारसा स्थळ म्हणून घोषित





महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या पुणे येथील गणेशखिंड बॉटनीकल गार्डन ही भारतातील एक जुनी उद्यानविद्या संस्था आहे. मुळा नदिच्या किनाऱ्यावर सन १७९६ ते १८१८ या कालावधीत बाजीराव पेशव्यांनी खुप मोठ्या प्रमाणावर आंब्याची झाडे येथे लावली. या परिसरास महाराष्ट्र शासनाने जैवविविधतेचा वारसा स्थळ घोषित करुन तिचे जैविक व ऐतिहासीक महत्व वाढविले आहे. या परिसरात रानटी व औषधी वनस्पती, वेगवेगळ्या बुरशी, किटक, सरपटणारे विविध

मफुकृवि ई वार्ता
जानेवारी २०२१
वर्ष :१, अंक क्रं. : १, जानेवारी २०२१ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी





प्राणी व पक्षी यांचे असंख्य प्रकार या परिसरात आढळुन येतात. या स्थळाला जैव विविधतेचे वारसा स्थळ घोषित करण्याच्या निर्णयामुळे जैव विविधतेची जपणुक करण्याबरोबरच अनेक नविन प्रकारच्या वनस्पतींच्या प्रजातींचे संवर्धन करणे सोपे होणार आहे, असे गणेशखिंड फळ संशोधन केंद्राचे सहयोगी संशोधन संचालक डॉ. विनय सुपे यांनी सांगितले. कुलगुरु डॉ. अशोक ढवण, अधिष्ठाता (कृषि) डॉ. अशोक फरांदे, संशोधन संचालक डॉ. शरद गडाख आणि कुलसचिव श्री. मोहन वाघ यांनी विद्यापीठाला ही गौरवास्पद बाब असल्याचे म्हटले आहे.

## दुष्काळाची पुर्वसूचना देणारी प्रणाली या विषयावर बुध्दीमंथन ऑनलाईन कार्यशाळेचे आयोजन



**दि. १३ जानेवारी, २०२१.** जागतिक बँक अर्थसहाय्यीत राष्ट्रीय उच्च शिक्षण प्रकल्प व भारतीय कृषि अनुसंधान परिषद नवि दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे सुरु असलेल्या हवामान अद्ययावत शेती व जल व्यवस्थापनाचे आधुनिक कृषि विज्ञान व तंत्रज्ञान प्रकल्पाच्या वतीने दुष्काळाची पुर्वसूचना देणारी प्रणाली या विषयावर बुध्दीमंथन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन नवी दिल्ली येथील भारतीय कृषि

अनुसंधान परिषदेच्या राष्ट्रीय कृषि उच्च शिक्षण प्रकल्पाचे राष्ट्रीय संचालक व शिक्षण विभागाचे उपमहासंचालक डॉ. आर.सी. अग्रवाल उपस्थित होते. याप्रसंगी संशोधन तथा विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख, महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे माजी विस्तार शिक्षण संचालक डॉ. किरण कोकाटे, कार्यक्रमाचे निमंत्रक डॉ. सुनिल गोरंटीवार, सहनिमंत्रक इन्होसॅपीएन कृषि तंत्रज्ञान प्रा.लि. मुंबईचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. सारंग नेरकर, भारतीय बायर ग्रुप मुंबईचे शाश्वतता विभागाचे प्रमुख श्री. सुहास जोशी, कार्यक्रमाचे आयोजन सचिव डॉ. मुकुंद शिंदे उपस्थित होते.

यावेळी डॉ. आर.सी. अग्रवाल मार्गदर्शन करतांना म्हणाले की दिवसेंदिवस कमी कमी होणाऱ्या पर्जन्यमानामुळे देशात दुष्काळाचा धोका वाढत आहे. दुष्काळाची पुर्वसुचना लवकर मिळण्यासाठी विकसीत केलेली प्रणाली ही फार महत्वाची आहे. हवामानासंबंधीची माहिती वेळेवर व अचूक मिळाल्यावर त्याप्रमाणे शेतकऱ्यांनी पिकांचे नियोजन करणे या गोष्टी देशातील कृषि क्षेत्रासाठी महत्वाच्या आहेत. यामध्ये अधिक संशोधन होण्यासाठी विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या संशोधन प्रकल्पांमध्ये पर्जन्यमान कमी झाल्यावर पडणाऱ्या दुष्काळाशी संबंधीत विषयावर भर देण्यात यावा. कार्यक्रमाचे स्वागत डॉ. शरद गडाख यांनी केले. श्री. सुहास जोशी यांनी कार्यक्रमा बद्दल माहिती दिली. डॉ. सुनिल गोरंटीवार यांनी दुष्काळाची पुर्व सूचना देणाऱ्या प्रणालीविषयी माहिती दिली. यावेळी झालेल्या तज्ञ मंडळाच्या चर्चेत महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. आर.बी. देशमुख, कामधेनु विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. एम.सी. वार्ष्णेय, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. बी. वेंकटेश्वरलु, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. व्यंकटराव मायंदे, पोकरा मुंबईचे प्रकल्प संचालक श्री. विकासचंद्र रस्तोगी (भा.प्र.से.), त्रिवेंद्रम येथील भारतीय अंतरीक्ष विज्ञान व तंत्रज्ञान संस्थेचे कुलसचिव, इस्त्रोचे माजी शास्त्रीय सचिव व एन.आर.एस.सी. चे माजी संचालक डॉ. वाय.व्ही.एन. कृष्णमुर्ती, भारतीय हवामान शास्त्र विभागाचे माजी उपमहासंचालक डॉ. एन. चटोपाध्याय यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. स्नेहल कानडे यांनी तर आभार डॉ. मुकुंद शिंदे यांनी मानले. या कार्यक्रमाचे समन्वयक म्हणुन डॉ. व्ही.एस. मालुंजकर, डॉ. स्नेहल कानडे यांनी काम पाहिले.

## सोयाबीन बिजोत्पादन कार्यक्रमाच्या बैठकीचे आयोजन

**दि. १२ जानेवारी, २०२१.** जिल्हा व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, अहमदनगर, विभागीय बीज प्रमाणीकरण अधिकारी, अहमदनगर, कृषि विभाग, अहमदनगर आणि महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांच्या संयुक्त विद्यमाने अहमदनगर जिल्ह्यातील शेतकरी शास्त्रज्ञ मंच सभासद यांचे शेतावर उन्हाळी सोयाबिन बिजोत्पादन कार्यक्रम राबविण्यासंबंधी ऑनलाईन बैठक आयोजीत करण्यात आली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे संशोधन तथा विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख होते.



यावेळी बियाणे महामंडळ अहमदनगरचे जिल्हा व्यवस्थापक श्री. आर. सी. जोशी, अहमदनगर येथील विभागीय बीज प्रमाणीकरण अधिकारी श्री. फिलीप डिसोजा, अहमदनगरचे कृषि उपसंचालक श्री. विलास नलगे, कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्राचे व्यवस्थापक प्रा. एम.एम. देसाई, सोयाबीन पैदासकार डॉ. मिलिंद देशमुख, तालुका कृषि अधिकारी, अहमदनगर, समन्वयक, शेतकरी शास्त्रज्ञ मंच, अहमदनगर व शेतकरी सभासद या कार्यक्रमास उपस्थित होते.

यावेळी डॉ. शरद गडाख मार्गदर्शन करतांना म्हणाले की येत्या खरीप हंगामात सोयाबीन बियाण्याची कमतरता भासु नये म्हणुन उन्हाळी बिजोत्पादन करणे गरजेचे आहे. उन्हाळ्यात खरीप हंगामापेक्षा रोग व किडींचा प्रादुर्भाव कमी असतो. बिजोत्पादन घेण्यासाठी जमिनीमध्ये ओलावा टिकवुन ठेवल्यास उत्पन्नामध्ये निश्चितपणे वाढ होईल. महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, अहमदनगर, विभागीय बीज प्रमाणीकरण अधिकारी, अहमदनगर, कृषि विभाग, अहमदनगर आणि महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी या सर्वाच्या समन्वयाने उन्हाळी सोयाबीन बिजोत्पादन कार्यक्रम यशस्वी करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

यावेळी प्रा. एम. एम. देसाई यांनी स्वागत केले. श्री. आर.सी. जोशी आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की उन्हाळी हंगामामध्ये सोयाबीन बिजोत्पादन घेण्यासाठी कृषि विद्यापीठातील शास्त्रज्ञांचे मार्गदर्शन मिळाले तर चांगल्या दर्जाचे उत्पन्न मिळणे सहज शक्य आहे. उन्हाळी हंगामामध्ये सोयाबीनचे बिजोत्पादन घेतल्यास बाजारातील सध्याच्या दरापेक्षा २५ टक्के वाढीव दराने सायाबीन खरेदी करण्यात यईल. याचबरोबर १० टक्के बोनस देण्याचे प्रस्तावित आहे. महाबिज उन्हाळी हंगामासाठी चांगल्या प्रकारचे बियाणे उपलब्ध करुन देईल. ज्या शेतकऱ्यांना उन्हाळी हंगामात सोयाबीन बिजोत्पादन घ्यायचे आहे त्यांनी जवळच्या महाबिज केंद्रास संपर्क साधण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. श्री. फिलिप डिसोजा, डॉ. मिलिंद देशमुख व श्री. विलास नलगे यांनी यावेळी मार्गदर्शन केले. हनुमंतगाव येथील श्री. मच्छिंद्र घोलप व श्री. भाऊसाहेब नवले या शेतकरी शास्त्रज्ञ मंचातील सभासद शेतकऱ्यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुनिल अडांगळे यांनी तर आभार डॉ. गोकुळ वामन यांनी मानले.

## कृषि विद्यापीठात स्वच्छता अभियान सुरु



**दि. २६ जानेवारी, २०२१.**महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे २६ जानेवारी या दिवशी प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधुन कुलगुरु डॉ. अशोक ढवण यांच्या सुचनेनुसार स्वच्छ परिसर, सुंदर परिसर, सुरक्षीत परिसर या संकल्पने नुसार

स्वच्छता अभियानाची सुरुवात करण्यात आली. यावेळी शरद कॉलनी परिसराची स्वच्छता करण्यात आली. यामध्ये कुलसचिव श्री. मोहन वाघ, सौ. वैशाली वाघ मॅडम, डॉ. पंडित खर्डे, डॉ. प्रकाश मोरे, डॉ. सचिन सदाफळ, श्री. राजेंद्र निक्रड, श्री. अजित हरिच्छंद्रे, श्री. अविनाश गायकवाड, श्री. राजु राठोड, सौ. सुरेखा निमसे, सौ. सुवर्णा घाडगे, सौ. शितल इथापे व कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदविला. यावेळी कॉलनीत राहणाऱ्या कर्मचाऱ्यांनी परिसरातील स्वच्छतेमुळे साप, विंचु यांचा प्रादुर्भाव कमी झाल्याचे सांगितले. येथुन पुढे प्रत्येक कॉलनीत दर रविवारी सामुहिक स्वच्छता मोहिम राबविण्याचे व त्यामध्ये जास्तीत जास्त कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदविण्याचे आवाहन कुलसचिवांनी यावेळी केले. कुलसचिव श्री. मोहन वाघ यांच्या सुचनेनुसार मध्यवर्ती परिसरातील पदव्युत्तर महाविद्यालयाचा परिसर, खेळाचे मैदान इत्यादि ठिकाणी स्वच्छतेची कामे सुरु करण्यात आली असून विद्यापीठाचा परिसर प्लॅस्टिक मुक्ती बरोबरच निटनेटका, सुंदर दिसू लागला आहे.

## विद्यापीठाच्या कृषि दिनदर्शिकेचे विमोचन



**दि. २५ जानेवारी, २०२१.**महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कृषि दिनदर्शिकेचे विमोचन कुलगुरु डॉ. अशोक ढवण यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी संशोधन तथा विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख, अधिष्ठाता डॉ. अशोक फरांदे, कुलसचिव श्री. मोहन वाघ, नियंत्रक श्री. विजय कोते, विद्यापीठ अभियंता श्री. मिलिंद ढोके, विभाग प्रमुख डॉ. सुनिल गोरंटीवार, प्रसारण केंद्राचे प्रमुख डॉ. पंडित खर्डे उपस्थित होते. यावेळी कुलगुरु डॉ. अशोक ढवण म्हणाले कृषि दिनदर्शिकेमध्ये शेतकरी बांधवाना प्रत्येक महिन्यात शेती कामासंदर्भात उपयुक्त अशा माहितीचा अंतरभाव केलेला आहे. ही कृषि दिनदर्शिका शेतकरी, विद्यार्थी आणि कृषि विस्तार कार्यकर्त्यांना उपयुक्त ठरणार आहे.

मफुकृवि ई वार्ता
जानेवारी २०२१

वर्ष :१, अंक क्रं. : १, जानेवारी २०२१   महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## जानेवारी महिन्यातील कृषि सल्ला

### भुईमूग (उन्हाळी)

- जानेवारीच्या तिसऱ्या आठवड्यात पेरणी करता येईल अशा बेताने पेरणीपुर्व ओलीत करावे. पेरणीसाठी सुधारीत फुले उन्नती, टी.ए.जी.२४,टी.जी.२६, टी. पी. जे. ४१, जे. एल. ५०१ , एस.बी ११, फुले भारती या वाणापैकी निवड करावी.
- उन्हाळी भुईमूगाची पेरणी १५जानेवारी ते १५ फेब्रुवारी दरम्यान करावी.
- पेरणीचे अंतर ३०X१० से.मी. ठेवावे त्यासाठी हेक्टरी १०० ते १२० किलो बियाणे वापरावे.
- पेरणीपुर्वी ३ ग्रॅम मॅन्कोझेब किंवा २ ग्रॅम कार्बेन्डझिम प्रती किलो बियाणास वापरून बीजप्रकिया करावी.

### ऊस

- ऊस बांधणीच्या अवस्थेत असलेल्या आडसाली उसाला हेक्टरी १६० किलो नत्र (३४५ किलो युरिया), ८५ किलो स्फुरद (५३१ किलो सिंगल सुपर फॉस्फेट) आणि ८५ किलो पालाश (१४२ किलो म्युरेट ऑफ पोटॅश)खतमात्रा देऊन ऊस बांधणी करावी. को – ८६०३२ या ऊस जातीसाठी २५% रासायनिक खतमात्रा वाढवून द्यावी.
- पूर्व हंगामी उसातील आंतरपिकाची बटाटा, फ्लॉवर, कोबी, मुळा, गाजर, व कांदा इ. पिकांची काढणी त्यांची अवस्था पाहून करावी.
- १२ ते १६ आठवडे झालेल्या उसाला नत्राचा तिसरा हप्ता द्यावा. यासाठी हेक्टरी ३४ किलो नत्र (७४ किलो युरिया) वापरावे, नत्रयुक्त खताबरोबर ६:१ या प्रमाणात निंबोळी पेंडीची भुकटी खतामध्ये मिसळून द्यावी.
- उसाची लागण सलग सरीवर मध्यम जमिनीत १००–१२० सें.मी., भारी जमिनीत १२०–१५० सें.मी. अंतरावर करावी अथवा ७५–१५० सें.मी. किंवा ९०–१८० सें.मी. जोड ओळ पध्दतीने करावी.

### हरभरा व्यवस्थापन

- जिरायती पिकांच्या वाणांची पक्वतेनुसार काढ़णी व मळणी करावी.
- बागायती हरभऱ्यासाठी घाटे भरण्याच्या अवस्थेत पाणी दयावे.
- किड व रोगांपासून संरक्षण करण्यासाठी शिफारशीत उपाययोजना करावी.

### रब्बी ज्वारी

- पहिला पंधरवाडा– पक्षांपासून संरक्षण करावे.
- दुसरा पंधरवाडा –ज्वारीच्या दाण्याच्या टोकाजवळ काळा ठिपक्याचे लक्षणे दिसताच ज्वारीची काढणी करावी व ८ ते १० दिवस कणसे उन्हात वाळवावीत.

### गहू

- उशिरा पेरणी केलेल्या गहू क्षेत्रातील जमिनीत कायमस्वरूपी ओलावा राहून पीक क्षेत्रात थंड हवामान राखण्यासाठी पिकास नेहमीपेक्षा कमी अंतराने म्हणजे १५ दिवसांनी योग्य मात्रेत पाणी दयावे.
- उशिरा पेरणी केलेल्या गहू क्षेत्रात तापमान कमी रहावे म्हणून गव्हासाठी तुषार सिंचनाचा वापर करावा. तुषारने

शेवटचे पाणी ८० ते ८५ दिवसांदरम्यान दयावे.

- वेळी पडलेल्या पावसामुळे किंवा तुषार पध्दतीने घेतलेल्या गहू क्षेत्रात दाणे काळे पडण्याची शक्यता असते ते टाळण्यासाठी दाणे भरण्याच्या अवस्थेत मेन्कोझेब + कॉपर ऑक्सिक्लोराईड, प्रत्येकी २० ग्रॅम, १० लि. पाण्यातून फवारावे.
- गहू पिकावर पेरणीनंतर ५५ व ७० दिवसांनी, दोन वेळा १९:१९:१९ या विद्राव्य खताची १० लि. पाण्यात २०० ग्रॅम या प्रमाणात फवारणी करावी.

**फळबाग व्यवस्थापन**

- डाळिंब – छाटणी करणे. आंबिया बहार धरावा, खताच्या योग्य रितीत मात्रा दयावी. आवश्यक असण्यास पानगळ करावी.
- बॅक्टेरीयल ब्लाईट (तेल्या) व रस शोषणाऱ्या किडींच्या नियंत्रणासाठी उपाययोजना करावी.
- बोर – पक्व फळांची काढणी करावी.
- अंजीर – फळांच्या संरक्षणासाठी जाळीचा वापर करावा. नियमित पाणी पुरवठा करावा.
- जांभूळ– खतांच्या मात्रा द्याव्यात.
- सिताफळ – सिताफळाचे स्टोनीफ्रुट काढून घेऊन बिगर हंगामी बहार धरावयाचा असल्यास शिफारशीत हलकी छाटणी करावी.
- कागदी लिंबू – शिफारशीत खतमात्रेच्या ३०% नत्राची मात्रा द्यावी. मृग बहाराच्या फळांची काढणी करावी.
- मोसंबी व कागदी लिंबू – मावा, सिल्ला आणि पाने पोखरणारी अळी : थायोमिथोक्झाम (२५ग्रॅम) १ ते १.५ ग्रॅम/१०लि. पाण्यातून फवारावे.

**भाजीपाला व्यवस्थापन**

- उन्हाळी हंगामातील भाजीपाला पिकांची लागवड करणेसाठी रान तयार करणे.
- उन्हाळी भाजीपाला उदा. भेंडी, गवार, कलिंगड, खरबूज, कारली, दुधी भोपळा, दोडका इ. पिकांची लागवड १५ जानेवारी नंतर करावी.
- खरीप हंगामातील मिरची पिकाची काढणी १० दिवसाच्या अंतराने करावी.
- खरीप हंगामातील वांगी पिकाची काढणी ४ ते ५ दिवसाचे अंतराने करावी.
- रबी हंगामातील लागवड करण्यात आलेल्या कोबीवर्गीय पिकांची खुरपणी करून पीक स्वच्छ ठेवावे.
- कोबीवर्गीय पिकांचे गड्डे तयार झाले असल्यास काढणी करावी.
- लसूण पीक दोन महिन्याचे झाले असल्यास खुरपणी करून नत्र खताचा दुसरा व अंतिम हप्ता द्यावा.
- वाटाणा पिकाची काढणी वेळेवर करावी जेणेकरून त्याची गोडी कमी होणार नाही.
- रबी हंगामातील टोमॅटो पीक फुलोरा अवस्थेत असल्यास खुरपणी करून शेत स्वच्छ करावे व खताची मात्रा द्यावी.
- टोमॅटो पिकास आधार देण्याचे काम पूर्ण करावे.
- रांगडा हंगामातील कांदा खुरपून स्वच्छ करावा, कांदा पोसण्याच्या अवस्थेत असल्याने खते देण्याचे टाळावे.
- रबी कांदा एक महिन्याचा झाला असल्यास खुरपणी करून नत्र खताचा हप्ता द्यावा.

## आले

- आल्याचे विविध प्रक्रियायुक्त पदार्थ तयार करण्यासाठी लागणीनंतर नऊ  महिन्यानंतर आल्याची काढणी करावी.
- बाजारातील मागणीप्रमाणे आल्याची काढणी करावी. गड्डे बाहेर काढताना त्यांना इजा होणार नाही याची खबरदारी घ्यावी. आल्याचा पाला कापून गड्डे, बोटे (नवीन आले) काढणीनंतर वेगळे करावे.
- काढणीनंतर आल्याचे कंद स्वच्छ धुवून मातीपासून वेगळे करावेत आणि बाजारात पाठवावे.
- प्रति हेक्टरी ओल्या आल्याचे सरासरी उत्पादन २० ते २५ क्विंटल पर्यंत येते.
- उत्तम निचऱ्याची जमीन असेल तर हेच आले १४ ते १६ महिने जमिनीमध्ये ठेवून आल्याचे व्दिहंगामी पीक घेता येते आणि याचे उत्पन्न पहिल्या वर्षापेक्षा दीडपट ते दुप्पट मिळते.
- आल्याची पाने सुकल्यानंतर आठ ते दहा दिवसांनी या पिकास पाणी द्यावे.
  साधारणत: अडीच ते तीन महिन्यानंतर पुन्हा नवीन फुटवे फुटु लागतात.

## अवजारे

**ट्रॅक्टरचलित फुले ऊस रोपे पुर्नलागवड यंत्र**

- ४५ अश्वशक्तीच्या ट्रॅक्टरने चालविता येते.
- १२० सें.मी. ते १५० सें.मी. दोन ओळीतील अंतरावर ऊस रोपांची पुर्नलागवड  करण्यासाठी उपयुक्त.
- एका दिवसात २.७५ ते ३.०० हेक्टर क्षेत्रावर ऊस रोपांची पुर्नलागवड शक्य.
- पारंपारिक खर्चापेक्षा खर्चात ६० ते ७० % बचत.
- पारंपारिक पद्धतीपेक्षा वेळेमध्ये ७० ते ८० % बचत.

**प्रकाशक** : डॉ. शरद गडाख
संचालक, विस्तार शिक्षण
**प्रमुख संपादक** : डॉ. पंडित खर्डे
प्रभारी अधिकारी, प्रसारण केंद्र
**सहसंपादक** : डॉ. सचिन सदाफळ
सहाय्यक प्राध्यापक, कृषि विस्तार
श्री. सुनिल राजमाने
कृषि सहाय्यक
**डिझाईनर** : श्री. राजेंद्र जांभळे
श्री. सिध्दार्थ साळवे
मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र. २३७५/२०२१